वर्धापन दिन... विशेषांक
तिसरा वर्धापनदिन
दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

सुख, समृद्धी, स्नेह आणि सौहार्दाचा प्रकाश
प्रत्येक मनात उजळो.
नव्या आरंभाची ही वेळ
आनंद, प्रेरणा आणि सकारात्मकतेने भरलेली ठरो.
दिपावली पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा

● वर्ष : ०३ ● अंक : ०४० ● पुणे ● बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने-१६ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

### विश्वासाच्या प्रवासातील

# तीन वर्षांचा यशस्वी "आरंभ"

- 'दै. आरंभ पर्व'च्या संपादिका या महिला असल्याचा अभिमान : सौ. तृप्तीताई देसाई
- डिजिटल युगात दैनिक चालवणे तारेवरची कसरतच : मा. श्री. नानजीभाई ठक्कर
- सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची 'दै. आरंभ पर्व'मध्ये ताकद : विश्वासराव आरोटे
- दै. आरंभ पर्वचा पुरस्कार माझ्यासाठी अधिक प्रेरणादायी : अभिनेता ओम यादव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या प्रचंड स्पर्धात्मक आणि डिजिटल युगात दैनिक चालवणे म्हणजे तारेवरची कसरतच आहे, अशा शब्दांत ठाण्याचे ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (अध्यक्ष, एन.के.टी. ग्रुप, ठाणे) यांनी पत्रकारितेच्या आव्हानात्मक प्रवासाचे वास्तव अधोरेखित केले. "आजही ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेचा दिवस वृत्तपत्र वाचल्याशिवाय सुरू होत नाही. कारण समाजातील वास्तव चित्र, जनतेचे प्रश्न, शासनाची जबाबदारी आणि लोकमत यांचा संगम फक्त दैनिकांच्या माध्यमातूनच होतो. सर्वसामान्यांचे प्रश्न लहान-मोठी दैनिकेच पुढे नेतात - त्यामुळे पत्रकारिता आजही समाजाचा खरा आरसा आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले.

ते दैनिक 'आरंभ पर्व'च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यातील श्री गणेश गार्डन लॉन्स अँड बँक्वेट हॉल येथे आयोजित भव्य सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला ठाणे, पुणे, मुंबई, अहिल्यानगर आदी भागांतून पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**"आरंभ पर्व" - शब्दांच्या प्रवासात उमललेले समाजभान!**

दैनिक आरंभ पर्व हे गत तीन वर्षांपासून समाजातील विविध घडामोडींचे सत्य आणि तटस्थ चित्रण करणारे वृत्तपत्र म्हणून ओळखले जाते. समाजातील दुर्लक्षित घटकांना आवाज देणे, शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि कामगार यांच्या प्रश्नांना अग्रक्रम देणे, तसेच सामाजिक न्याय आणि पारदर्शक प्रशासन यासाठी आरंभ पर्वने सातत्याने योगदान दिले आहे.

**मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रम :** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुधाकरराव जाधवर होते. व्यासपीठावर 'दै. आरंभ पर्व'च्या संचालिका तथा संपादिका सौ. सुरेखा मते, व्यवस्थापकीय संपादक मा. श्री. प्रतिक गंगणे, निवासी संपादक मा. श्री. लक्ष्मण साबळे, मार्केटिंग हेड मा. श्री. अभिषेक मरगळे, पुणे शहर पत्रकार मा. श्री. महेश वरवटे, फोटोग्राफर मा. श्री. जवाहर पाटील, भूमाता ब्रिगेडच्या ज्वलंत नेत्या तृप्ती ताई देसाई, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, सुप्रसिद्ध अभिनेता सुभाष यादव, अभिनेत्री व मॉडेल मयुरी नवटे, अभिनेत्री सराह मोतीवाल, मा. श्री. माजी उपमहापौर प्रसन्नदादा जगताप, स्विफ्ट डिटेक्टिव अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका मा. सौ. प्रिया काकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष मा. श्री. काकासाहेब चव्हाण तसेच संपूर्ण कार्यक्रम अगदी जल्लोषात पार पाडणारे प्रसिद्ध निवेदक मा. श्री. राज शिनारे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरंभ पर्वचे व्यवस्थापकीय संपादक प्रतीक गंगणे यांनी केले. त्यांनी 'आरंभ पर्व'च्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचे आणि संपादकीय ध्येयाचे सविस्तर विवेचन केले.

या कार्यक्रमात 'आरंभभूषण पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांद्वारे पत्रकारिता, समाजसेवा, शिक्षण, आणि कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

समाजभूषण पुरस्कार : प्रख्यात समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणे) यांना प्रदान!

सामाजिक कार्यातील विशेष पुरस्कार : भूमाता ब्रिगेडच्या नेत्या तृप्ती ताई देसाई यांना!

सिनेअभिनेता क्षेत्रातील पुरस्कार : लोकप्रिय कलाकार सुभाष यादव यांना!

पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार : विविध नामांकित दैनिकांचे संपादक आणि पत्रकार!

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार : कार्यकर्ते, शिक्षक, आणि संस्थापक सदस्य!

या सर्व पुरस्कार विजेत्यांचा सन्मान शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला.

कार्यक्रमात स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या गीत-संगीत व कवितांनी सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. 'पत्रकारितेची नवी दिशा' या विषयावर आयोजित संवाद सत्रात अनेक तरुण पत्रकारांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना ठाण्याचे ख्यातनाम उद्योगपती व समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (अध्यक्ष, एन.के.टी. ग्रुप, ठाणे) यांनी पत्रकारितेचे महत्त्व, समाजातील माध्यमांची भूमिका आणि जबाबदारी यावर अत्यंत प्रभावी शब्दांत भाष्य केले. त्यांचे हे भाषण कार्यक्रमातील सर्वात प्रेरणादायी क्षण ठरले.

नानजीभाई ठक्कर म्हणाले, "पत्रकारिता ही केवळ बातम्यांचा प्रवाह नाही, तर ती समाज बदलण्याची ताकद असलेली एक क्रांती आहे. समाजातील चांगल्या-वाईट घडामोडींचा अभ्यास करून, लोकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार करतात. त्यामुळे पत्रकार हे समाजाचे जागृत डोळे आहेत. त्यांची लेखणी ही तलवारीपेक्षा तीक्ष्ण असते."

ते पुढे म्हणाले, "आजच्या या युगात मोठी माध्यमसंस्था असो वा छोटं ग्रामीण दैनिक - जर प्रामाणिक हेतू, सामाजिक जबाबदारी आणि सत्याला वाचा फोडण्याची हिंमत असेल, तर ते दैनिक समाजात परिवर्तन घडवू शकते. लहान वृत्तपत्रांमधूनही मोठे विचार उभे राहतात. कारण खरी ताकद वृत्तपत्राच्या आकारात नसते, ती लेखकाच्या विचारात आणि संपादकाच्या प्रामाणिकतेत असते."

ठक्कर यांनी पत्रकारांना उद्देशून सांगितले की, "पत्रकारितेत टिकण्यासाठी केवळ मथळे झळकवणे किंवा टीआरपी मिळवणे हे उद्दिष्ट नसावे. पत्रकाराने स्वतःला समाजाचा शिल्पकार समजावे. त्याने सत्य, पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधला पाहिजे. ज्या दिवशी पत्रकाराचे लेखन समाजातील एखाद्या गरीब, शेतकरी, विद्यार्थी किंवा स्त्रीच्या हितासाठी उपयोगी पडेल, त्या दिवशीच खरी पत्रकारिता साकारेल."

त्यांनी पुढे आपल्या समाजसेवेच्या अनुभवावरून सांगितले की, "मी आयुष्यभर समाजकार्यात आहे. मी पाहिलं आहे की एक लहानशी बातमी, एक संपादकीय लेख कित्येक वेळा लोकांच्या आयुष्यात आशेचा किरण बनतो. पत्रकाराचा एक शब्द प्रशासनाला जागं करतो, तर समाजात विचारांची क्रांती घडवतो. म्हणूनच पत्रकारांनी कधीही आपल्या लेखणीची धार कमी होऊ देऊ नये."

(पान ३ वर)



**दै. आरंभ पर्वच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्तीताई देसाई यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, "दै. आरंभ पर्वच्या संपादिका या महिला आहेत, याचा मला विशेष अभिमान आहे." त्यापुढे म्हणाल्या, "महिला संपादक म्हणून त्या समाजातील विविध प्रश्नांना धैर्याने आणि संवेदनशीलतेने हाताळतात, ही बाब प्रेरणादायी आहे." तृप्तीताई म्हणाल्या की प्रतिक गंगणे आणि लक्ष्मण साबळे हे नेहमी संपर्कात असतात आणि दै. आरंभ पर्वची वाटचाल कौतुकास्पद आहे.**

## सिद्धार्थदादा संजयजी भोकरे यांना 'आरंभरत्न पुरस्कार' प्रदान

**दै. आरंभ पर्वच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २०२५' सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (डिजिटल मीडिया) चे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. सिद्धार्थदादा संजयजी भोकरे यांना 'आरंभरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या प्रभावी नेतृत्वगुणांबरोबरच डिजिटल पत्रकारितेच्या क्षेत्रातील कार्य, संघटन कौशल्य आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात आला.**


**या सोहळ्याला पत्रकारिता, शिक्षण, उद्योग, समाजकार्य आणि मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.**



**कार्यक्रमाला भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा सौ. तृप्तीताई देसाई, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. संजयजी चोरडिया, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक मा. श्री. सुधाकरराव जाधवर, उद्योजक व दानशूर व्यक्तिमत्व मा. श्री. नानजीभाई ठक्कर, तसेच स्विफ्ट डिटेक्टिव अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका मा. सौ. प्रिया काकडे हे मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.**







# कला, डिझाईन आणि तंत्रज्ञानाची त्रिवेणी एमआयटी-एडीटी विद्यापीठ

● प्रा. चंद्रकांत बोरुडे ●
जनसंपर्क अधिकारी (पीआरओ), एमआयटी-एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे

**(दै. आरंभ पर्व)**

भारतामधील उच्चशिक्षणाच्या सतत बदलणाऱ्या क्षेत्रात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाने शैक्षणिक काटेकोरपणा, सर्वांगीण विकास, संशोधन, नवनिर्मिती आणि उद्योजकतेवर दिलेल्या भरामुळे देश-विदेशात विशेष स्थान निर्माण केले आहे.

२०१५ मध्ये माईट्स एज्युकेशन ग्रुपच्या अंतर्गत संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यापीठाची स्थापना झाली. त्याआधी २००४ पासून संस्थेने अभियांत्रिकी, डिझाईन, आर्ट्स, म्युझिक आणि ॲनिमेशनसारख्या विविध शाखांमध्ये दर्जेदार शिक्षण दिले आहे. नुकत्याच झालेल्या पहिल्याच चाचणीत या विद्यापीठाला नॅककडून 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी कटिबद्ध असलेले एमआयटी-एडीटी विद्यापीठ हे केवळ शैक्षणिक ब्रँड नसून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यासाठी झटणारे एक सांस्कृतिक आणि बौद्धिक केंद्रस्थान आहे. दिवंगत अभिनेते राज कपूर यांच्या वास्तव्य लाभलेल्या आणि १५०+ एकरवर पसरलेल्या विश्वराजबाग परिसरातील हे विद्यापीठ एक प्रकारे 'एज्युकेशन टाउनशिप' आहे. विद्यापीठ परिसरातील जगातील सर्वांत मोठा घुमट — संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती डोम — आणि राज कपूर यांच्या आठवणी सांगणारे राज स्मारक हे येथील प्रमुख आकर्षण आहेत.

पुणे–सोलापूर महामार्गालगत असलेले हे विद्यापीठ हडपसरजवळ असल्याने शहराच्या तसेच एमआयडीसी आणि आयटी कंपन्यांच्या जवळ आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगांशी थेट संपर्क व रोजगाराच्या संधी अधिक मिळतात. विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फिल्म मेकिंग, व्हिज्युअल आर्ट्स, वेदशास्त्र, इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट, डिझाईन, नर्सिंग, फाईन आर्ट्स, लॉ, मर्चंट नेव्ही अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यातले विद्यार्थी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये सतत चमक दाखवत आहेत.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर :** कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश तु. कराड यांच्या ऊर्जस्वल नेतृत्वाखाली एमआयटी स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट विद्यार्थ्यांना शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त, भावनिकदृष्ट्या मजबूत, मानसिकदृष्ट्या सजग, तांत्रिकदृष्ट्या सक्षम, भाषिकदृष्ट्या पारंगत आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण घडवते.

योग, ध्यान, व्यावसायिक कौशल्ये, नैतिकता, केंब्रिज प्रमाणित संवादकौशल्य, सर्जनशील व रंगभूमी कला आणि सामाजिक समरसता अशा अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थी आत्मविश्वासी, कुशल आणि नैतिक व्यावसायिक म्हणून घडतात. भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी करण्यापूर्वीपासूनच विद्यापीठाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे शिक्षण पुरविण्यास सुरुवात केली, ही उल्लेखनीय बाब आहे.

**जागतिक स्पर्धेत तारणारे नवनवीन अभ्यासक्रम :** 'A leap towards World Class Education' हे विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून ते कृतीत उतरवले जात आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विश्वनाथ स्पोर्ट्स मीट, पर्सोना आणि 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन'सारख्या उपक्रमांतून विद्यापीठ नवनवीन संधी निर्माण करत आहे.



## क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांवर विशेष भर

**शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रम हे एमआयटी-एडीटीचे वैशिष्ट्य आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये येथील विद्यार्थ्यांनी पदके मिळवली आहेत. तसेच, वार्षिक 'विश्वनाथ स्पोर्ट्स मीट', 'पर्सोना फेस्ट' आणि 'कल्चरल कार्निव्हल' सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.**

## हरित कॅम्पस आणि टिकाऊ विकास

**विश्वराजबाग कॅम्पस हा इको-फ्रेंडली व ऊर्जा-बचतीच्या संकल्पनेवर आधारित कॅम्पस म्हणून ओळखला जातो. सौरऊर्जा प्रकल्प, पावसाचे पाणी साठवण, कचरा व्यवस्थापन आणि हिरवळ या माध्यमातून पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जातात. विद्यापीठाने 'ग्रीन कॅम्पस अवॉर्ड' मिळवून टिकाऊ विकासासाठीची आपली बांधिलकी सिद्ध केली आहे.**



तसेच, विद्यापीठाने नुकताच अग्निशमन अभियांत्रिकी (फायर इंजिनिअरिंग) मध्ये एम.टेक. अभ्यासक्रम सुरू केला असून असा अभ्यासक्रम सुरू करणारे एमआयटी-एडीटी हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

**संशोधन व नवनिर्मिती :** जागतिक दर्जाचे विद्यापीठ होण्याच्या उद्दिष्टासाठी एमआयटी-एडीटी विद्यापीठाने अनेक मोठी व्यासपीठे उभारली आहेत. ज्यात क्रेया, SCIL, SHD तसेच अटल इन्क्युबेशन सेंटर (नीती आयोगाच्या अटल इनोव्हेशन मिशनअंतर्गत) आदी केंद्रांचा समावेश आहे.

याअन्वये विद्यापीठाने ४००+ कॉपीराइट्स, १२५+ पेटंट्स, १७९+ संशोधन प्रकल्प, ९००+ संशोधन लेख, ९०+ इन्क्युबेशन प्रकल्प साध्य केले असून शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन कौन्सिलकडून ५-स्टार मानांकन, एआरआयआयएमध्ये 'एक्सलंट' बँड अशा अनेक आघाड्यांवर यश संपादन केले आहे.

**नोकरीची हमी : विद्यार्थ्यांनी मिळवली लाखोंची पॅकेज :** एमआयटी-एडीटी विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला नोकरीची १००% हमी दिली जाते. विशेष म्हणजे, महाराष्ट्र नौदल शिक्षण व प्रशिक्षण अकादमी (मॅनेट) मध्ये मर्चंट नेव्ही अभियांत्रिकीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनीला पहिल्याच दिवशी नोकरीचे नियुक्तीपत्र दिले जाते. आजवर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी गुगल, मायक्रोसॉफ्ट, अलीबाबा, पोलो, डिलॉइट, टीसीएस अशा अग्रगण्य कंपन्यांमध्ये लाखोंच्या पॅकेजवर नोकऱ्या मिळवल्या आहेत. गेल्या वर्षी कु. अनुश्री गुंड (५८ लाख प्रतिवर्ष) व कु. सोनिया जाधव (५३.२ लाख प्रतिवर्ष) या विद्यार्थिनींनी उच्च पॅकेज मिळवले. जागतिक भागीदारी आणि परदेशी शिक्षणाच्या संधी

एमआयटी-एडीटी विद्यापीठाने अमेरिकेतील, युरोपमधील व आशियातील अनेक नामांकित विद्यापीठांशी सहकार्य करार केले आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅम्स, ड्युअल डिग्री तसेच जॉइंट रिसर्च प्रोजेक्ट्सची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर शिक्षण घेण्यासोबतच आंतरराष्ट्रीय अनुभवही मिळतो.

(लेखक विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आहेत. संपर्कासाठी : pro@mituniversity.edu.in किंवा 020-67653064)



**"विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी कला, डिझाईन आणि तंत्रज्ञानाचे सर्वांगिण शिक्षण मिळावे यासाठी २०१५ मध्ये विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूल्याधारित संस्कार आणि नवोन्मेषी दृष्टिकोन हीच आमच्या विद्यापीठाची ओळख आहे. विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर तयार करण्यासाठी आम्ही सातत्याने उद्योगांशी सहकार्य राखून अभ्यासक्रम तयार करत असतो."**

**- प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्याध्यक्ष तथा प्र. कुलपती, एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे**

## एमआयटी-एडीटी विद्यापीठाची यशोगाथा...

- नॅककडून पहिल्याच साखळीत 'अ' श्रेणी (सीजीपीए ३.११)
- क्युएस विश्वविद्यापीठ क्रमवारीत आर्ट व डिझाईन गटात १५०–२०० अशी श्रेणी
- टाईम्स ऑफ इंडियाच्या इम्पॅक्ट रँकिंग २०२५ मध्ये समावेश
- वुरी-२०२५ मध्ये जागतिक ९वे स्थान
- एमआयआरएफ २०२४ मध्ये इनोव्हेशन गटात ५१–१०० बँड
- एआरआयआयएमध्ये 'एक्सलंट' क्रमवारी
- शिक्षण मंत्रालयाच्या एमआयसीकडून ५-स्टार मानांकन
- अटल इन्क्युबेशन सेंटर – महाराष्ट्रातील पहिले खासगी विद्यापीठ (२७ स्टार्ट-अप्सना सहाय्य)
- विशेष अय्यर यांना ६८ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात सर्वांत आशादायक दिग्दर्शक पुरस्कार

## राष्ट्रनिर्मितीचे ध्येय

**एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ ही केवळ एक संस्था नाही, तर आत्मनिर्भर भारत, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था आणि शांततामय, प्रगतिशील समाजाच्या दिशेने उभारलेली एक चळवळ आहे. उत्कृष्टतेच्या दृष्टीकोन, नवनिर्मितीची निष्ठा आणि परंपरेचा आदर या मूल्यांवर आधारित एमआयटी-एडीटी विद्यापीठ भारताच्या उद्याचे शिल्पकार घडवत आहे. त्याचमुळे, 'ऑक्सफर्ड ऑफ इस्ट' म्हणवल्या जाणाऱ्या पुणे नगरीत एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाने आपला वेगळा ठसा उमठवित स्वतःला जागतिक ब्रँड म्हणून सिद्ध केले आहे.**















# सर्वसामान्य जनतेचे प्रश्न छोटे दैनिकच पुढे नेऊ शकतात

पान १ वरून

नानजीभाई ठक्कर यांनी पत्रकारितेला "लोकशाहीचा प्राणवायू" असे संबोधले.

"आपल्या देशात लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर स्वतंत्र आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेची गरज आहे. शासन, समाज आणि नागरिक यांच्यामधील पूल म्हणजे पत्रकार. त्यामुळे तुमचे कार्य पवित्र आहे, त्यात सातत्याने प्रामाणिकपणा, धैर्य आणि संवेदनशीलता जोपासा," असे ते म्हणाले.

त्यांच्या या प्रभावी भाषणादरम्यान सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. अनेक मान्यवरांनी त्यांच्या विचारांना "समाजसेवेचा आदर्श मार्गदर्शक संदेश" अशी दाद दिली. उपस्थित पत्रकारांनीही ठक्कर यांचा आदर्श आपल्या कार्यात उतरवण्याचा संकल्प व्यक्त केला.

नानजीभाई ठक्कर यांच्या या प्रेरणादायी भाषणाने कार्यक्रमाला केवळ वैचारिक नव्हे, तर सामाजिक दिशा दिली. त्यांच्या शब्दांतून प्रामाणिक पत्रकारितेचे सामर्थ्य आणि समाजसेवेची भावना स्पष्टपणे जाणवली.

डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शन - "पत्रकारिता ही लोकशाहीचे बळ, आणि समाजजागृतीचे साधन आहे!"

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थितांना अत्यंत विचारपूर्ण आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणाने सभागृहातील प्रत्येक पत्रकार, समाजसेवक आणि वाचकांना पत्रकारितेच्या खरी जबाबदारीची जाणीव करून दिली.

"पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही, ती सामाजिक बांधिलकी आहे"

आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच डॉ. आरोटे म्हणाले - "पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याचे माध्यम नाही, ती समाजातील विचारप्रवाह निर्माण करणारी शक्ती आहे. पत्रकार हा समाजाचा प्रहरी, लोकशाहीचा पहारेकरी आणि सत्याचा शोधक असतो. म्हणूनच पत्रकारितेच्या कार्यात जबाबदारी, प्रामाणिकता आणि निष्ठा हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत."

त्यांनी पुढे नमूद केले की, "आजच्या काळात सोशल मीडियाच्या वेगात अनेकदा अफवा आणि चुकीची माहिती पसरते. परंतु खऱ्या अर्थाने पत्रकार तोच जो सत्याची पडताळणी करून जनतेसमोर सत्य ठेवतो. पत्रकाराने केवळ बातमी सांगू नये, तर ती समाजाला दिशा देईल अशी सादरीकरणाची जबाबदारी पार पाडली पाहिजे."

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी 'दैनिक आरंभ पर्व'च्या सातत्यपूर्ण आणि निर्भीड कार्याचे विशेष कौतुक केले.

ते म्हणाले -"आरंभ पर्वसारखी तळागाळातील लोकांसाठी लढणारी दैनिकेच समाजातील खरी क्रांती घडवतात. ग्रामीण जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचवणे, अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे आणि सामान्य माणसाच्या हितासाठी काम करणे - हाच खरा पत्रकारितेचा आत्मा आहे. आरंभ पर्व हे कार्य प्रामाणिकपणे करत आहे."

त्यांनी उपस्थित पत्रकार बांधवांना आवाहन केले की, "पत्रकारितेचा दर्जा टिकवण्यासाठी आपल्याला दररोज स्वतःला विचारावे लागेल - आपण समाजासाठी काय लिहितो आहोत? आपल्या लेखणीमुळे कोणावर अन्याय तर झाला नाही ना, कोणाला न्याय मिळाला का? कोणाचा आवाज उठला का? ही आत्मपरीक्षणाची वृत्तीच पत्रकाराला समाजाचा दीपस्तंभ बनवते."

डॉ. आरोटे यांनी दैनिक आरंभ पर्वच्या संपादकीय टीमचे अभिनंदन करत सांगितले -

"फक्त तीन वर्षांच्या कालावधीत आरंभ पर्वने आपल्या लेखनातून आणि वृत्तसंकलनातून जो समाजातील विश्वास संपादन केला आहे, तो कौतुकास्पद आहे. अशा प्रामाणिक पत्रकारितेमुळेच समाजाचा चौथा स्तंभ अजूनही मजबूत आहे. आरंभ पर्वच्या पुढील वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा."

त्यांनी व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे आणि संपूर्ण आरंभ पर्व परिवाराचे कौतुक करत "सत्य, साहस आणि समाजहित" ही त्रिसूत्री कायम ठेवण्याचे आवाहन केले.

## प्रेरणादायी क्षणांचा टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद!

**डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या ओजस्वी व प्रभावी मार्गदर्शनावर सभागृहात उपस्थित पत्रकार, मान्यवर, वाचक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांच्या भाषणातील शब्दांनी अनेक तरुण पत्रकारांना नवचेतना मिळाली आणि पत्रकारितेच्या कार्यात नवी ऊर्जा संचारली. डॉ. विश्वासराव आरोटे यांचे हे मार्गदर्शन आरंभ पर्वच्या वर्धापन दिन सोहळ्याचे एक महत्त्वाचे आकर्षण ठरले. त्यांच्या विचारांमधून पत्रकारितेची खरी दिशा, समाजातील तिचे स्थान आणि लोकशाहीतील तिचे योगदान स्पष्ट झाले. त्यांच्या शुभेच्छांमुळे कार्यक्रमाला केवळ उत्सवाचेच नव्हे, तर वैचारिक आणि प्रेरणादायी रूप प्राप्त झाले.**

## राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २०२५ - आदर्श जनसेवक पुरस्कार प्राप्त मान्यवर


मा. श्री. निलेश गिरमे


मा. श्री. भूपेंद्र मोरे




मा. श्री. बाप्पूसाहेब पोकळे-पाटील


मा. श्री. दत्ताभाऊ कोल्हे




मा. श्री. रुपेश घुले पाटील


मा. श्री. नागेश चव्हाण







































दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.








राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार


नवचेतना पुरस्कार


नवचेतना पुरस्कार


मा. श्री. संजयजी चोरडिया
संस्थापक
मार्केटिंग


बिझनेस कोच
साबळे
श्री. अभिषेक
मार्केटिंग






















आरंभपर्व
राज्यस्तरीय नवचेतना
पुरस्कार २०२५






ाज्यस्तरीय नवचेतना पुरस्का




तकांचे लेखक व बिझनेस कोच
संस्थापक जाधवर ग्रुप




रीय नवचेतना पुरस्कार २०


MAHIRA
DEVELOPERS
पुणे प्रहार


ज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २०२५
मा. श्री. प्रतिक गंगणे








MAHIRAJ DEVELOPERS
मा. सौ. सुरेखा मते
मा. श्री. लक्ष्मण साबळे
अभिषेक मरगळे






































पुणे प्रहार
दैनिक
आरंभपर्व












ज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २०२


शुभदीपावली
सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
Global WaWes Media
Sachin P. Barange, Shraddha Barange
Mob: 8796786456 , 9850325098
Address - Delux Palm , Row House No 07, Mauli Nagar , Beed Bypass , Aurangabad - 431001



शब्दांच्या आणि भावना
यांच्या संगमातून घडतो संवाद,
आणि संवादातून निर्माण
होतो विश्वासाचा दीप.
त्या उजेडातच आम्ही दररोज
तुमचं यश उजळतो.
FUZION
PUBLIC RELATIONS
India's Most Trusted Regional PR Consultancy
आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला प्रकाशमय, यशमय
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
मा. श्री. गिरीश करपे 99234 08402
HAPPY
DIWALI
FESTIVAL OF LIGHTS


PR MATTERS
Public
Relations
म्हणजे फक्त बातम्या नव्हेत, ती एक भावना आहे.
संवादाची, विश्वासाची, ओळखीची.
या दिवाळीत उजळवा आपल्या
ब्रँडचं नाव PR Matters सोबत!
Warm wishes for a prosperous
Diwali
PR Matters
कडून प्रकाशमय
दिवाळीच्या शुभेच्छा!
मा. श्री. करण झोंबाडे, मो.नं.8087561515


THIS DIWALI, LIGHT UP
YOUR BRAND WITH TRUST.
For over two decades, Maharashtra Media Services & Public Relations Pvt. Ltd. has been the most trusted name in PR and media advocacy. From rural roots to national reach, we amplify voices, build credibility, and deliver impact.
Together, let's turn challenges into opportunities and celebrate brighter beginnings.
HAPPY
DIWALI!
23+ Years of PR Excellence
PAN India Network – 10 Offices | 200+ Markets
500+ National & Global Brands Handled
250+ Happy Clients | 150+ Successful Campaigns
Trusted Leadership & Proven Results
MAHARASHTRA
MEDIA SERVICES & PUBLIC RELATIONS PVT.LTD.
Address: Office No. 105, Mandke Business Centre, 1st Floor, 652, Narayan Peth, Appa Balwant Chowk, Pune - 411030, Maharashtra, India.
Contact: +91 98225 27727 / 99234 08400
Email: raju.nikam@maharashtramedia.in
www.maharashtramedia.in


UCHIT Media
Service noble cause
विश्वासाचा उजेड, संवादाची दिशा!
विश्वास आणि व्यावसायिकतेच्या
बळावर मीडियाक्षेत्रात आपली ओळख
निर्माण करणारे
UCHIT MEDIA SERVICES
या दिवाळीत आपल्या
सर्व सहकाऱ्यांना आणि ग्राहकांना देत आहे
प्रकाशमय आणि समृद्ध
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
आपल्या सहकार्यानेच संवादाच्या
या प्रवासाला मिळते ऊर्जा आणि उजेड!
Flat 3, First Floor, Vishnu Narhar Apartment, 1468 Sadashiv Peth,
Renukaswarup School Lane, Tilak Road, Pune - 411030
9767789529 | 8329581972


अश्वमेध कम्युनिकेशन
आयडियांची दौड, संवादाचा अश्वमेध!
दिवाळीचा उत्सव...
प्रकाशाचा, नवसर्जनाचा आणि नात्यांचा!
या प्रकाशमयी पर्वावर आम्ही उजळवतो
ब्रँडचा विश्वास, संवादाची दिशा आणि
नात्यांची जाणीव!
आपली ओळख,
आमचा अभिमान,
आपला संदेश,
आमचा संकल्प!
reative • Strategic • Impactful
अश्वमेध कम्युनिकेशन
जिथे प्रत्येक मोहिम
एक नव्या विजयानं संपते!
ASHWAMEDH
COMMUNICATIONS
संपर्क:- 99214 46690 कैवल्य पेठकर
A Division of Ideas & Influence


पुण्यातील अल्पावधीत जनतेच्या
हक्काचे व्यासपीठ ठरलेल्या
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
ॲड.प्रसन्नदादा जगताप
मा. अध्यक्ष - शहर सुधारणा समिती, पुणे म.न.पा, विद्यमान नगरसेवक,
माजी उपमहापौर-पुणे म.न.पा.,
मा. चेअरमन विद्यमान सदस्य: पुणे मर्चंट को.ऑप. बँक


MIT Art, Design & Technology
University, Pune
NAAC A
ACCREDITED
MIT-ADT
UNIVERSITY
PUNE, INDIA
"Innovation for Sustainability"
Countdown Begins...
Happy Diwali
nirf
GOLD RATING
Hon'ble Prof. Dr. Vishwanath D. Karad
Founder, MAEER's MIT Group of Institutions &
Founder Chancellor & President,
MIT-ADT University, Pune
Prof. Dr. Mangesh T. Karad
Executive President & Pro-Chancellor,
MIT-ADT University, Pune
• B.Tech. | M.Tech. • BFA | MFA • BA | MA • BCA | MCA • LLB | LLM • B.Ed.
• B.Sc. | M.Sc. • B.Arch. | M.Arch. • BBA | MBA • B.Des. | M.Des. • BPA | MPA • B.Com.
55+ STARTUP INCUBATES
2000+ MAJOR RECRUITERS
61+LPA HIGHEST PACKAGE
150+ ACRES CAMPUS
17+ PREMIUM INSTITUTIONS
50+ FOREIGN UNIVERSITIES COLLABORATION
910+ SCOPUS RESEARCH PUBLICATIONS
238 INTERNATIONAL & NATIONAL PATENTS
Enquire Now
Vishwarajbaug, Loni Kalbhor, Pune - 412 201, Maharashtra, India


पुण्यातील
जनतेचे
हक्काचे
व्यासपीठ,
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक शुभेच्छा...
मा. श्री. रमेश बापु
गायकवाड
उपाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा पुणे शहर



पुण्यातील जनतेचे
हक्काचे व्यासपीठ,
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना
शुभ
दिपावली
हार्दिक
शुभेच्छा...
शुभेच्छक:-
सौ. दिपाली संजय
धिवार
जनसेविका


"ज्ञान, बुद्धी आणि सद्विचारासाठी शिक्षण"
- प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर
Jadhavar®
The Symbol of Success (Since 2014)
जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्
ही दिपावली आपणांस
सुखसमृद्धीची, भरभराटीची,
आनंददायी
आणि
आरोग्यदायी जावो
हीच ईश्वर चरणी प्रार्थना !
संस्थापक अध्यक्ष
उपाध्यक्ष
दिपावलीच्या
तेजोमय शुभेच्छा !
प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर
M.Com, M.A., LL.M., M.P.M., D.T.L., D.L.L. & L.W., G.D.C. & A., Ph.D.
अ‍ॅड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर
M.B.A., P.G.D.H.R.M., M.Com., D.H.R. & L., D.C.L., D.C.P.L., A.P.C.L., C.M.E.D., D.L.L. & L.W., LL.M.
जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्


Presents
DREAM HOME LUCKY DRAW!
MAHIRAJ DEVELOPERS
लकी ड्रॉ
₹50 लाखांचे
3 BHK रो हाऊस
फक्त 300 रुपयांत...
मिळणार
जिंका तुमचे स्वप्नातील घर!
"नशिबाचा खेळ, घर जिंकण्याची संधी फक्त ₹300 मध्ये!"
कुपन छोटं... पण स्वप्न मोठं !
रेडीपझेशन @ कोल्हेवाडी, सिंहगड, पुणे.
माहीराज डेव्हलपर्स 9096 2424 84 | 705 705 6668
श्री. राकेश मोरे
डायरेक्टर
Office : Office No. 101,Mayuresh Appartment, Dhayari Phata, Vadgaon- Dhayari, Pune-411041
Email: mahirajdevelopers007@gmail.com


SINCE : 1977
श्री
स्वामी बॅग्ज्
Our Brand
Goodluck
समरवेअर | रेनवेअर | विंटरवेअर
www.shriswamibags.com
शनिपार जवळ सदाशिव पेठ | माणिकबाग सिंहगड रोड | धनकवडी सातारा रोड | नागनाथ पार सदाशिव पेठ
amazon | Flipkart | snapdeal
Franchise Enquiry Welcome 8605241010


वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
20 OCT
28 OCT
श्री. अनंतदादा दांगट पाटील
श्री. हेमंतदादा दांगट पाटील
शुभ दिपावली
शुभेच्छुक : - नगरसेविका सौ. नीताताई दांगट पाटील मित्र परिवार


पुण्यातील जनतेचे
हक्काचे व्यासपीठ
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
मा. श्री.
सारंग बाळासाहेब नवले
मा. अध्यक्ष (भारतीय जनता युवा मोर्चा
खडकवासला मतदारसंघ)


महाराष्ट्राचे शिल्पकार
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
शुभ
दिपावली
सर्वांना हार्दिक शुभेच्छा.
शुभेच्छुक-
प्रमोद सुरेश
कापसे
(M.sc. Agri.,Dip.in Business Manag)
सरचिटणीस सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस
जिल्हा संघटक, कृषी पदवीधार सोलापूर जिल्हा
सौजन्य-
स्वानंद इन्फ्रा बिल्डटेक प्रायव्हेट लिमिटेड, सोलापूर
द प्लांट मार्ट नर्सरी ,सोलापूर
तुळजाभवानी वॉटर सप्लायर, सोलापूर
नेचर लँडमार्क अॅग्री हॉर्टिटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ,सोलापूर
बळीराजा कृषी सेवा केंद्र,जवळगाव
बळीराजा कृषी सेवा केंद्र ,सारोळा


20 ऑक्टोबर
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
सर्वसामान्य जनतेचा
आधारवड ,
सामाजिक कार्यकर्ते ,
पुणे शहर ओबीसी
मोर्चा उपाध्यक्ष
रमेश बापू
गायकवाड
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
प्रतिक गंगणे
(व्यवस्थापकीय संपादक)
लक्ष्मण साबळे
(निवासी संपादक)
अभिषेक मरगळे
(मार्केटिंग हेड)
शुभेच्छुक- दैनिक आरंभपर्व मिडिया ग्रुप


दिवाळीच्या मुहर्ती
अंगणीभाग्यलक्ष्मीची
स्वारीयावी.. सुख-समाधान,
आरोग्य, आणि धनसंपदा,
गुफूंना हात
हाती तुमच्या दारी यावी..
शुभ
दिपावली
शुभ
दीपावली
निमित्त आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा..!
सौ. निताताई अनंतदादा दांगट पाटील
मा.नगरसेविका, पुणे मनपा.
HAPPY
DIWALI
FESTIVAL OF LIGHTS


पुण्यातील जनतेचे
हक्काचेव्यासपीठ,
ध्येय विकासाचं प्रत्येकाच्या प्रगतीच...
दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
मा. श्री.
गंगाधर मडावळे
माजी स्वीकृत नगरसेवक पुणे मनपा


पुण्यातील जनतेचे
हक्काचे व्यासपीठ,
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
मा. श्री.
संतोष (दादा) मते
मा .सरपंच खडकवासला


पुण्यातील अल्पावधीत जनतेच्या
हक्काचे व्यासपीठ ठरलेल्या
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
BE.Civil
हरिदास कृष्णा चरवड
मा. नगरसेवक पुणे मनपा


पुण्यातील जनतेचे
हक्काचे व्यासपीठ,
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
धायरी.... पुन्हा सोन्याची पायरी
सर्वांना
शुभदीपावली
हार्दिक शुभेच्छा...
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
सुरेखाताई रमेश दमिष्टे (पोकळे),
माजी जिल्हा परिषद सदस्य,
निलेश सुरेखा रमेश दमिष्टे
सोशल मीडिया अध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार,
खडकवासला मतदारसंघ
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) खडकवासला विधानसभा, रुपेश दमिष्टे मित्रपरिवार.







## थोडक्यात पण महत्वाचे



## हिंदू वज्र सेना, हिंदुस्थानतर्फे सिंहगडावर दिवाळीचा पहिला दिवा प्रज्वलित

- **स्वराज्य, शिवछत्रपती आणि पराक्रमाच्या तेजाने उजळला सिंहगड दुर्ग**

पुणे (आरंभ पर्व) : हिंदू वज्र सेना, हिंदुस्थान यांच्या वतीने "*दिवाळीचा पहिला दिवा स्वराज्याचा*" या उपक्रमांतर्गत सिंहगड दुर्गावर दीप प्रज्वलन करून दिवाळीच्या उत्सवाची सुरुवात करण्यात आली. हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक वारशाचा सन्मान राखत १९ ऑक्टोबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला. या प्रसंगी महारुद्र मर्दानी आखाडा, नवी मुंबई तसेच श्री. ओंकार दादा मांढरे, मानसी घुले आणि पूर्वा ताई शिंदे यांच्या सहकार्याने शस्त्रवंदना करण्यात आली. या अनोख्या उपक्रमामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच खुलली.शिवछत्रपतींच्या पराक्रमाचा, मावळ्यांच्या बलिदानाचा आणि स्वराज्याच्या तेजाचा स्मरण करत दुर्गावरील दीप प्रज्वलित करण्यात आला.कार्यक्रमानंतर सर्व सहभागी दुर्गरक्षकांनी परिसराची स्वच्छता करून पर्यावरण-जागरुकतेचा संदेश दिला आणि शिस्तबद्धपणे मार्गस्थ झाले.

## पर्वती-नवी पेठ भागात राष्ट्रवादीकडून 'महाभोंडला' उत्साहात संपन्न!

पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) पुणेच्या प्रतीक्षाताई मंगेश जाधव यांनी प्रभाग क्रमांक २७, पर्वती-नवी पेठ भागातील महिला भगिनींसाठी आयोजित केलेला 'महाभोंडला' कार्यक्रम (शुक्रवार, दि. २६/०९/२०२५) मोठ्या उत्साहात पार पडला. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जय जवान मित्र मंडळ, लक्ष्मीनगर, पर्वती येथे सायंकाळी ७ वाजता या पारंपरिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिला भगिनींच्या मोठ्या सहभागाने आणि पारंपरिक उत्साहाने हा परिसर आनंदमय झाला होता. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या, माजी स्थायी समिती अध्यक्षा तथा नगरसेविका अश्विनीताई नितीन कदम यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून कार्यक्रमाला भेट दिली आणि उपस्थित सर्व महिला भगिनींशी मनमोकळा संवाद साधला. 'महाभोंडला' कार्यक्रमामुळे महिलांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची आणि संस्कृती जपण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे मंगेश जाधव यांनी सर्व महिला भगिनी, मित्र मंडळी आणि विशेषतः उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले.

## रोहिणी राहणे यांचा भारत-तिब्बत सहयोग मंचाकडून सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संघाचे पुण्यधाम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोतीबाग येथे भारत-तिब्बत सहयोग मंचाच्या वतीने आयोजित भव्य कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यात मंचाच्या राष्ट्रीय अध्यक्षा माननीय सौ. रेखाजी गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीसह श्री. मोहनजी बागमार (क्षेत्रीय संयोजक – पश्चिम क्षेत्र), श्री. समाधानदादा गायकवाड (उपप्रदेशाध्यक्ष – पंचायत राज), सौ. उल्का ताई, विंग कमांडर श्री. गुप्ताजी तसेच प्रसिद्ध गायक आणि Voice of Kishore Kumar म्हणून ओळखले जाणारे श्री. मकरंद पाटणकर यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल रोहिणी राहणे यांना "भारत-तिब्बत सहयोग मंच" तर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. रोहिणी राहणे यांनी या सन्मानाबद्दल संस्थेचे आणि उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच हा सन्मान आपले पुढील कार्य अधिक जोमाने करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# डिजिटल सुरक्षेचा नवा चेहरा – आर्टिफिशियल इंटेलिजन्स विरुद्ध सायबर गुन्हे

- **नितेश गोटे, आयटी सल्लागार (एक्सपर्टव्ह्यू बिझनेस सर्व्हिसेस)**



**(दै. आरंभ पर्व)**

जग आता झपाट्याने डिजिटल होत आहे. बँक व्यवहार, व्यवसाय, शिक्षण, शासन – सगळं काही ऑनलाइन झालंय.

या डिजिटल क्रांतीला गती देणारे तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI).

मानवी बुद्धीपेक्षा जलद आणि अचूक निर्णय घेणारी ही प्रणाली आता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहे.

पण, या तंत्रज्ञानाचाच वापर आता सायबर गुन्हेगार करत असल्याने डिजिटल सुरक्षेचा नवा आणि गंभीर प्रश्न उभा राहिला आहे.

कधीकाळी हॅकिंगसाठी उच्च तांत्रिक ज्ञान लागत असे.

आज मात्र AI मुळे गुन्हेगारीचे स्वरूपच बदलले आहे.

डीपफेक व्हिडिओ, बनावट आवाज, खोट्या ईमेल्स, ऑटो-जेनरेटेड मेसेजेस — या सर्वांमुळे "खोटं आणि खरं" ओळखणं अवघड झालं आहे. कोणाचाही फोटो, आवाज किंवा व्हिडिओ क्षणात तयार होऊ शकतो आणि त्याचा गैरवापरही तेवढ्याच वेगाने होतो.

या तंत्रज्ञानाने सायबर गुन्ह्यांना एक वेगळीच धार दिली आहे.

पण हाच AI आता सायबर सुरक्षा क्षेत्रात 'संरक्षक' म्हणूनही उदयास आला आहे. AI आधारित सुरक्षा प्रणाली लाखो डेटा पॅटर्न्सचा अभ्यास करून क्षणात धोका ओळखते.

एखाद्या वापरकर्त्याच्या असामान्य क्रियाकलापांवर नजर ठेवून ती त्वरित अ‍ॅक्शन घेते.

अनेक कंपन्यांनी "AI Threat Detection" प्रणाली कार्यान्वित केल्या आहेत, ज्या भविष्यातील हल्ल्यांची आधीच सूचना देतात.

म्हणजेच तंत्रज्ञानाचा हल्ला रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचाच वापर — हीच नव्या युगाची गरज आहे.

आणि नागरिकांची जबाबदारी ही तितकीच महत्त्वाची आहे.

आपण डिजिटल भविष्याकडे वाटचाल करतोय, पण या वाटेवर प्रत्येक क्लिकसोबत एक धोका लपलेला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्यासाठी वरदान ठरू शकते, फक्त आपण तिला समजून वापरल्यास.

EXPERTVIEW
BUSINESS SERVICES

तथापि, तंत्रज्ञान कितीही प्रगत झालं तरी अंतिम सुरक्षा मानवी सजगतेतच दडलेली आहे. सुरक्षित पासवर्ड, दोन-स्तरीय प्रमाणीकरण, नियमित अपडेट्स आणि अनोळखी लिंक्स टाळणे — हे मूलभूत नियम आज प्रत्येक नागरिकाने पाळलेच पाहिजेत.

डिजिटल भारताच्या वाटचालीत सायबर साक्षरता

अन्यथा, तीच बुद्धिमत्ता आपल्या विरोधात वापरली जाईल.

तंत्रज्ञान आपल्याला सुरक्षित ठेवू शकतं, पण त्यासाठी आपणही सजग राहणं गरजेचं आहे.

भविष्य तंत्रज्ञानाचं असेल, पण सुरक्षा जागरूकतेची असेल.

**कारण शेवटी, डिजिटल जगातला सर्वात मजबूत पासवर्ड एकच – आपली सतर्कता!**

## शेळगाव आर मतदारसंघात रूपाली नागेश चव्हाण यांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष!

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

शेळगाव आर मतदारसंघातील आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सौ. रूपाली नागेश चव्हाण यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. आपल्या सामाजिक कार्यातून आणि जनसंपर्कातून लोकांमध्ये विशेष ओळख निर्माण केलेल्या नागेश चव्हाण यांच्या त्या पत्नी आहेत.

नागेश चव्हाण हे सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

सामाजिक आणि सेवाभावी कार्याचा ठसा उमटवणाऱ्या सौ. रूपाली नागेश चव्हाण या "तुळजाभवानी प्रतिष्ठान व बहुउद्देशीय संस्था, जवळगाव नं. 2" च्या अध्यक्षा असून, त्यांनी



महिलांच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रम राबवले आहेत. याचबरोबर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीतही त्यांनी नशीब आजमावले आहे.

त्यांचे पती नागेश चव्हाण हे उद्योजक व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस असल्याने त्यांच्या योगदानाचीही दखल घेण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्याशी असलेले घनिष्ठ आणि स्नेहपूर्ण संबंध आणि स्थानिक स्तरावरील चांगला जनाधार यामुळे रूपाली चव्हाण यांची उमेदवारी निश्चिततेकडे झुकत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बार्शी तालुक्यातील निवडणुका स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतल्याने शेळगाव आर मतदारसंघात स्पर्धा अधिक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

"जनतेची सेवा हीच खरी पूजा" या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन सौ. रूपाली नागेश चव्हाण या राजकीय क्षेत्रात जनतेच्या विश्वासाचा नवा अध्याय लिहिण्यास सज्ज झाल्या आहेत. मतदारसंघातील नागरिकांमध्ये त्यांचा वाढता प्रभाव आणि लोकांशी असलेली घट्ट नाळ पाहता, ही उमेदवारी पक्षासाठीही महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## १५ लाखांची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सायबर चोरट्यांनी डेक्कन आणि कोथरूड परिसरातील दोन महिलांना शेअर बाजारात मोठ्या परताव्याचे आमिष दाखवत १५ लाख रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी डेक्कन आणि कोथरूड पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### सुट्टीची सुचना

**आज बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ व गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर २०२५**


**दिपावली निमित्त**

**दै. आरंभपर्व कार्यालयाला सुट्टी असल्याने २३ ऑक्टोबर व २४ ऑक्टोबर रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. २५ ऑक्टोबर पासून अंक नियमितपणे सुरू राहिल. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**- संपादिका**

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक






# मला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याचा प्रस्ताव

## मुरलीधर मोहोळ यांचा गौप्यस्फोट

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

'अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठिशी सरकार ठामपण उभे असून, मदतीच्या ३१ हजार कोटी रुपयांपैकी पहिल्या टप्यात आठ हजार २०० कोटी रुपयांच्या रकमेचा शासन आदेश काढण्यात आला आहे,' असे कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी सांगितले.

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या डॉ. केशव बळीराम हेडगेवार या इमारतीचे उद्घाटन सोमवारी झाले. त्यावेळी भरणे बोलत होते. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, शंकर मांडेकर, माजी आमदार बाळा भेगडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विजयकुमार सरनाईक यावेळी उपस्थित होते. भरणे म्हणाले, 'राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारही मोठी मदत करत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भरीव



मदत केली जाईल. संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी ठामपणे उभे आहे.'

मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'मावळ तालुका हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमी आहे. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला उमेदवारी मिळावी म्हणून शेळके यांचा प्रयत्न होता. परंतु, उमेदवारी मिळणार नसल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कोथरुडमधून माझेही तिकीट कापल्याचे त्यांनी मला सांगितले. चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी मिळाली होती. त्यावेळी शेळके यांनी मला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याचा प्रस्ताव दिला होता. परंतु, मी प्रस्ताव नाकारला. भाजपमध्ये राहिलो. त्यामुळे माझे आणि शेळके यांचेही भले झाले'.




# चार हजार महिलांना दिवाळी सरंजाम वाटप





## कोल्हेवाडीत दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराचा प्रेमळ उपक्रम

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

कोल्हेवाडी येथे समाजासाठी आपुलकीने काम करणारा दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवार यंदाही दिवाळीच्या सणात लोकांच्या आनंदाचा भाग ठरला. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे आणि त्यांच्या पत्नी धनश्रीताई कोल्हे यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून चार हजार महिला भगिनींना दिवाळी सरंजाम वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला कोल्हेवाडी, खडकवासला, नांदेड, जेपीनगर किरकटवाडीतील महिला भगिनींनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवला. महिलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता, तर अनेक घरांत सणाचा उजेड आणि गोडी पसरली.


कार्यक्रमाला शहर भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दुष्यंत मोहोळ, पुणे शहर भाजपा उपाध्यक्ष सचिन मोरे , माजी सरपंच सुभाष नाणेकर, किशोर पोकळे, संदीप पोकळे, मा भाजप महिला मोर्चा अध्यक्ष रश्मी घुले पाटील, अजय कोल्हे, अश्विनी पालवे,प्रकाश गोरे,अजय मते, महेश हगवणे,

हेमेंद्र जोशी,लक्ष्मण तांदळे, प्रदीप हगवणे, शेखर हगवणे, सचिन लांगोरे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे मार्गदर्शन आमदार भीमराव तापकीर यांनी केले.

"लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचं खरं समाधान आहे," असे भावनिक शब्द दत्ताभाऊ कोल्हे यांनी व्यक्त केले.

दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराच्या या उपक्रमामुळे कोल्हेवाडी आणि परिसरातील हजारो घरांत दिवाळीचा उत्साह अधिक उजळला. समाजासाठी मनापासून केलेली ही सेवा लोकांच्या आयुष्यात आनंद आणि आशेचा प्रकाश घेऊन आली आहे.






# दै. आरंभ पर्वचा आश्वासक चेहरा

# मा. श्री. लक्ष्मण साबळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पत्रकारितेच्या प्रवासात काही चेहरे असे असतात जे केवळ वृत्तलेखनापुरते मर्यादित राहत नाहीत, तर त्यांच्या विचारात, दृष्टिकोनात आणि कार्यपद्धतीतून संपूर्ण संस्थेला दिशा देतात. **दै. आरंभ पर्व**च्या अशाच आश्वासक चेहऱ्यांपैकी एक म्हणजे मा. श्री. लक्ष्मण साबळे - ज्यांनी आपल्या प्रामाणिक लेखणी, तळमळीच्या कार्यशैली आणि समाजाशी नाळ जोडणाऱ्या वृत्तीमुळे **'आरंभ पर्व'**ला नवे आयाम प्राप्त करून दिले आहेत.

**निष्ठा आणि जबाबदारीची जाणीव :** निवासी संपादक पदाची जबाबदारी ही केवळ प्रशासनिक कामापुरती मर्यादित नसून, ती एका वृत्तसंस्थेच्या आत्म्याला दिशा देणारी भूमिका आहे. ही जबाबदारी श्री. लक्ष्मण साबळे यांनी अत्यंत गांभीर्याने आणि सजगतेने पार पाडली आहे. त्यांच्या संपादकीय मार्गदर्शनाखाली **दै. आरंभ पर्व**ने विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय घडामोडींवर सखोल व निष्पक्ष वृत्तांकन करत वाचकवर्गाचा विश्वास जिंकला आहे.

**सामाजिक जाण व संवेदनशील लेखन :** साबळे सरांची लेखनशैली ही साधी, प्रामाणिक आणि विचारप्रधान आहे. त्यांच्या प्रत्येक लेखातून समाजातील वास्तव, प्रश्न आणि उपाय यांचा शोध घेतला जातो. ग्रामीण भागातील प्रश्नांपासून ते नागरी समस्यांपर्यंत - प्रत्येक विषयाला त्यांनी न्याय दिला आहे. त्यांची वृत्तदृष्टी ही केवळ घटनांच्या मांडणीपुरती मर्यादित नसून, ती विचारांच्या गाभ्यापर्यंत पोहोचते.

**नेतृत्वगुण आणि संघभावना : आरंभ पर्व**च्या संपादकीय संघात त्यांनी एक सक्षम नेतृत्व दिले आहे. प्रत्येक सहकाऱ्याला प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि योग्य स्वातंत्र्य देत त्यांनी कार्यसंस्कृती विकसित केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संपादकीय टीमने अनेक विशेषांक, सामाजिक अभियानं आणि प्रबोधनपर उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडले आहेत.

**समाजहिताचा ध्यास :** लक्ष्मण साबळे हे केवळ पत्रकार नाहीत, तर ते समाजघटकांच्या वेदना जाणणारे सजग नागरिक आहेत. त्यांच्या लेखणीमधून सामाजिक न्याय, शिक्षण, पर्यावरण आणि लोकहिताचे प्रश्न सातत्याने पुढे आले आहेत. त्यांनी पत्रकारितेला केवळ व्यावसायिक क्षेत्र म्हणून न पाहता, ती एक सामाजिक जबाबदारी मानली आहे.

**दै. आरंभ पर्व**च्या प्रवासात लक्ष्मण साबळे यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या संपादकीय विचारांनी वृत्तपत्राची ओळख अधिक प्रभावी बनवली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली "राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार", "विशेषांक प्रकाशन" आणि अनेक सामाजिक उपक्रमांना मिळालेला प्रतिसाद हा त्यांच्या कार्यक्षमतेचा पुरावा आहे.

मा. श्री. लक्ष्मण साबळे हे **दै. आरंभ पर्व**साठी केवळ निवासी संपादक नाहीत, तर ते संस्थेचे विचारधारक आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांची उपस्थिती ही **आरंभ पर्व**च्या विश्वासार्हतेचा आणि प्रगतीचा पाया आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हे वृत्तपत्र समाजाशी जोडलेले, सत्याशी निष्ठावंत आणि नवचेतनेच्या दिशेने वाटचाल करणारे माध्यम म्हणून सतत पुढे जात आहे.

नुकताच पार पडलेला **'दै. आरंभ पर्व'**चा तिसरा वर्धापनदिन हा त्यांच्या मार्गर्शनाखाली उत्तमरित्या आणि नियोजनबद्धपणे पार पडला.



मा. श्री. प्रतिक गंगणे, व्यस्थापकीय संपादक, पुणे







पुण्यातील जनतेचे
हक्काचे व्यासपीठ,
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना शुभदीपावली
हार्दिक
शुभेच्छा...
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
आर्किटेक्ट
नरेंद्र दत्तात्रय हगवणे
•मा.उपसरपंच किरकटवाडी
•जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
शरदचंद्र पवार अभियंता सेल, पुणे


अल्पावधीतच
आपल्या कार्याने,
सर्वांच्या हक्काचे
व्यासपीठ बनलेल्या
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
च्या तिसऱ्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक
शुभेच्छा...
सर्वांना
दीपावली
च्या हार्दिक शुभेच्छा...
पुणे महानगरपालिका
निखिल लक्ष्मण धावडे
अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा दक्षिण खडकवासला मतदारसंघ.
मा .उपसरपंच कोंढवे धावडे


पुण्यातील जनतेचे हक्काचे
नवे व्यासपीठ ठरलेल्या
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
संकल्प आमचा
जनतेच्या हिताचा;
सर्वांगीण विकासाचा !!
वर्तमानपत्राच्या तिसऱ्या वर्धापन दिनाच्या
तसेच सर्व नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
सोपान उर्फ काका चव्हाण
मा. नगरसेवक, पुणे महानगरपालिका
अनिकेत सोपान (काका) चव्हाण
संचालक धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान